वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे

महाराष्ट्र शासन

स्वतंत्र्याचा अमृत महोत्सव

# उपवनसंरक्षक, नांदेड वनविभाग, नांदेड यांचे कार्यालय

गांधी पुतळयामागे, चिखलवाडी कार्नर, नांदेड. ४३१६०१ दुरध्वनी क्र.०२४६२-२३५५६२ फॅक्स नंबर ०२४६२-२४६५५६ ई-मेल-dycfnanded@mahaforest.gov.in

**ईमेलव्दारे**

विषय :- वनसंवर्धन अधिनियम १९८० अंतर्गत सार्वजनिक बांधकाम विभाग यांना चुंचा-मुखेड रोड, आणि मुदखेड-जांब राज्यमार्ग क्रमांक २६१ चे दुपदरीकरण करण्यासाठी नांदेड जिल्हयातील १८.१८ हे राखीव वनक्षेत्र वळतेकरणा बाबत.

जा.क्रं.अ/जमीन/एफसीए/ 869 /सन २०२२-२३
नांदेड -४३१ ६०१ दिनांक 5 /०९/२०२२

प्रति,
मा. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक),
औरंगाबाद

संदर्भ :- १. मा. अवर सचिव, महसूल व वनविभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचे कार्यालयाचे पत्र क्रमांक जा.क्र.एफएलडी-२०२२/प्र.क्र.२१६/फ-१० दिनांक २२/०८/२०२२

२. मा.अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, तथा केंद्रस्थ अधिकारी म.रा.नागपुर यांचे कडील पत्र क्र. कक्ष-१७/नोसेल/औरं/३७/आयडी-१३७७९/१२८३/२२-२३ दिनांक २२/०८/२०२२.

३. मा. मुख्य वनसंरक्षक, (प्रा.) औरंगाबाद यांचे कडील पत्र क्र. कक्ष-५/जमीन/प्र.क्र.७२/१८४४/२१-२२ दिनांक २२/०८/२०२२.

-----

उपरोक्त संदर्भिय पत्राचे अनूषंगाने विषयाकिंत बाबत वनसंवर्धन अधिनियम १९८० अंतर्गत सार्वजनिक बांधकाम विभाग यांना चुंचा-मुखेड रोड, आणि मुदखेड-जांब राज्यमार्ग क्रमांक २६१ चे दुपदरीकरण करण्यासाठी नांदेड जिल्हयातील १८.१८ हे राखीव वनक्षेत्र वळतेकरणाबाबत चे प्रस्तावाचे अनूषंगाने संदर्भिय पत्रान्वये कळविल्यानूसार १ ते ३ मुद्दे बाबतचा अहवाल आवश्यक त्या कागदपत्रासह यासोबत जोडून सादर करण्यात येत आहे.

**सहपत्र** :- वरीलप्रमाणे

( केशव वाबळे )
उपवनसंरक्षक
नांदेड वनविभाग, नांदेड

प्रतिलिपीः- मा. अवर सचिव, महसूल व वनविभाग, महाराष्ट्र शासन म.रा. मंत्रालय, मुंबई यांना संदर्भिय पत्राचे अनूषंगाने सहपत्रासह माहितीस्तव व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीस्तव सविनय सादर.

प्रतिलिपीः- मा. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (केंद्रस्थ अधिकारी) म.रा. नागपुर यांना संदर्भिय पत्राचे अनूषंगाने सहपत्रासह माहितीस्तव व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीस्तव सविनय सादर.

प्रतिलिपीः- कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नांदेड यांना माहितीस्तव व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीस्तव रवाना.

( केशव वाबळे )
उपवनसंरक्षक
नांदेड वनविभाग, नांदेड

Scanned with CamScanner

**नसंवर्धन अधिनियम १९८० अंतर्गत सार्वजनिक बांधकाम विभाग यांना चुंचा-मुखेड रोड, आणि मुदखेड-जांब राज्यमार्ग क्रमांक २६१ चे दुपदरीकरण करण्यासाठी नांदेड जिल्हयातील १८.१८ हे राखीव वनक्षेत्र वळतेकरणाबाबत तपशिल**

| अ.क्र. | मुद्दा | तपशिल |
|---|---|---|
| १. | प्रकल्पामध्ये वनभंग झालेला असल्याने प्रकल्प यंत्रणेकडून दंडात्मक नक्त वर्तमान मूल्य (Penal NPV) वसूल करण्यात आली किंवा कसे ? | सदर प्रस्तावामध्ये प्रकल्प यंत्रणेकडून वनभंग झालेला असल्याने विहीत प्रपत्रात वनभंगाबाबतचा सविस्तर अहवाल आवश्यक त्या कागदपत्रासह प्रस्तावासोबत सादर करण्यात आलेला आहे. तसेच वनभंगाबाबत जी रक्कम भरणा करणे आवश्यक असेल ती रक्कम प्रकल्प यंत्रणा भरणा करण्यास तयार असल्याचे हमीपत्र प्रकल्प यंत्रणेने प्रस्तावा सोबत पान क्रमांक १०० वर सादर केलेले आहे.<br>तसेच वनसंवर्धन अधिनियम १९८० अंतर्गतचे मार्गदर्शक सुचनेतील १.२१ मध्ये नमूद केल्यानूसार दंडात्मक नक्त वर्तमान मूल्य (Penal NPV) हि रक्कम रूपये १,११,१०४/- एवढी भरणेसाठी सदर प्रस्तावास केंद्र शासनाकडून तत्वतः मंजूरी प्राप्त झाले नंतर प्रकल्प यंत्रणेस सविस्तर डिमांड नोट देवून दंडात्मक नक्त वर्तमान मूल्य (Penal NPV) ची रक्कम व केंद्र शासनाकडून तत्वतः मंजूरीनूसार ज्या अटी व शर्ती प्राप्त होतील त्यानूसार प्रकल्प यंत्रणेकडून वसूल करण्यात येतील. |
| २. | प्रकल्पासाठी वळती करावयाच्या वनजमीन मौजे रोहीपिंपळगाव तांडा गट नं ११७ आणि गट क्रमांक १२८ मध्ये खाजगी खातेदराची नावे नमूद करण्यात आली आहेत. सदरची जमीन वनजमिन आहे किंवा कसे ? असल्यास त्यावरील हक्क धारकांना जमिनीचा मोबदला देण्यात आला किंवा कसे ? | सदर प्रकल्पासाठी वळती होत असलेल्या मौजे रोहीपिंपळगाव तांडा येथील सर्व्हे नं ७६ भाग चा नवीन गट नं ११७ चे या विभागाचे फॉर्म नं १ नूसार क्षेत्र १४०.४२४ हेक्टर आणि सर्व्हे नं ११७ भाग चा नवीन गट नं १२८ चे क्षेत्र ७५.९१ हेक्टर आहे व हैद्राबाद वन कायदा १९ जरिदा नं २७ दिनांक १४/०७/१३५६ व हैद्राबाद वन कायदा १९ जरिदा नं २६ दिनांक ०७/०७/१३५६ नूसार जमीनीचा वैधानिक दर्जा हा राखीव वन आहे. सदर ७/१२ वरती मौजे रोहीपिंपळगाव तांडा येथील सर्व्हे नं ७६ भाग चा गट नं ११७ चे क्षेत्र १३५.३२ हेक्टर पैकी गायरान रोहीपिंपळगाव तांडा ६१.५८ हेक्टर अशी नोंद आहे. व सर्व्हे नं ११७ भाग चा नवीन गट नं १२८ चे क्षेत्र ७/१२ नूसार क्षेत्र ८४.०४ असून त्यापैकी या विभागाचे फॉर्म नं १ नूसार ७५.९५ हेक्टर राखीव वन म्हणून नोंद आहे.<br>सदरच्या ७/१२ वरती गायरान रोहीपिंपळगाव तांडा ऐवजी महाराष्ट्र शासन वनविभाग राखीव वन म्हणून नोंद घेणेसाठी पुर्वी तसेच आजघडीला मा. तहसिलदार, मुदखेड यांना या कार्यालयाचे पत्र क्रमांक जा.क्र.नांववि/जमीन/११९३/२२-२३ दिनांक ०६/०६/२०२२ अन्वये त्यांचे कार्यालयास सविस्तर अहवाल सादर करण्यात आलेला आहे. **(सुलभ संदर्भाकरिता छायांकित प्रत यासोबत सादर करण्यात येत आहे.)** त्यानूसार सर्व्हे नं ११७ भाग चा नवीन वन गट नं १२८ चे क्षेत्र ७५.९५ हेक्टर क्षेत्राची नोंद ७/१२ अभिलेख्यात ऑनलाईन दिनांक २३/०८/२०२२ रोजी नोंद घेवून ७/१२ ची प्रत या कार्यालयास देण्यात आलेली आहे. **(सुलभ संदर्भाकरिता छायांकित प्रत यासोब सादर करण्यात येत आहे.)** तसेच आजघडीला सदरचे क्षेत्र या वनविभागाचे ताब्यात आहे. सर्व्हे नं ७६ चा नवीन गट नं ११७ चे महसूल विभागाचे ७/१२ |

Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| | | नूसार क्षेत्र १३५.३२ हेक्टर आहे. त्यापैकी ७८.८४ हे जमीन महसूल विभागाकडून वाटप झालेली दिसून येते. सदर ७/१२ वरती जे खातेदाराचे नावे दर्शविण्यात आलेले आहेत ते खाजगी खातेदाराला ७८.८४ हेक्टर जमीन वाटप झालेली दिसून येते.<br>सदर प्रस्तावामध्ये रस्त्याचे कामामध्ये बाधीत होत असलेले क्षेत्र हे खाजगी खातेदाराला वाटप झालेले नसून ते या विभागाचे ताब्यात आहे. तसेच मौजे रोहीपिंपळगाव तांडा येथील सर्व्हे नं ७६ भाग चा नवीन गट नं ११७ चे ७/१२ वरती गायरान रोहीपिंपळगाव तांडा ऐवजी महाराष्ट्र शासन राखीव वन म्हणून नोंद करून घेण्याची कार्यवाही महसूल विभागाचे स्तरावर प्रगतीपथावर आहे. |
| ३. | पर्यायी वनीकरणासाठी प्रस्तावित करण्यात आलेली मौजे गुंडवळ ता. माहूर जि. नांदेड येथील जमीन वनेत्तर जमीन असल्याचे नमूद करण्यात आले आहे. मात्र जमिनीचा ७/१२ पाहता सदरची जमीन वनजमीन असल्याचे दिसून येते. सदर प्रकल्प राज्य शासनाचा असल्याने पर्यायी वनीकरणासाठी वनेत्तर जमीनीची आवश्यकता आहे किंवा कसे ? | सदर प्रकल्प हा राज्य शासनाचा असल्याने पर्यायी वनीकरणासाठी वनेत्तर जमीनीची आवश्यकता आहे. पर्यायी वनीकरणासाठी प्रस्तावित करण्यात आलेली मौजे गुंडवळ ता. माहूर जि. नांदेड येथील गट नं ७० ची जमीन पुर्वी महसूल विभागाकडील वनेत्तर गायरान जमीन होती. परंतु सार्वजनिक बांधकाम विभागाकडील एकूण ८ रस्त्याचे प्रस्तावाचे अनूषंगाने सदर प्रकल्प राज्य शासनाचा असल्याने प्रकल्प यंत्रणेस बाधीत होत असलेल्या क्षेत्राचे बदल्यात तेवढेच क्षेत्र पर्यायी वनीकरणासाठी उपलब्ध करून देणे बंधनकारक असल्याने सदर जमीन लागवडी योग्य व अतिक्रमण मुक्त असल्याबाबतचा अहवाल मा. जिल्हाधिकारी, नांदेड यांना या कार्यालयाचे पत्र क्रमांक जा.क्र.नांववि/जमीन/२५२५/२०-२१ दिनांक ३१/०८/२०२२ अन्वये सादर करण्यात आला होता.<br>त्यानूसार मा. जिल्हाधिकारी, नांदेड यांनी त्यांचे कार्यालयाचे आदेश क्रमांक जा.क्र.२०२०/मशाका-२/जमीन/टे-२/सीआर-३८ दिनांक ३०/१२/२०२० व सुधारित आदेश क्रमांक २०२०/मशाका-२/जमीन/टे-२/सिआर-३८ दिनांक २०/०७/२०२२ अन्वये सार्वजनिक बांधकाम विभागाकडील एकूण १० प्रस्तावाचे अनूषंगाने सदर जमीन पर्यायी वनीकरणासाठी या वनविभागास हंस्तातरीत करून, ताबा देवून व ७/१२ वरती गायरान ऐवजी महाराष्ट्र शासन राखीव वन विभाग म्हणून नोंद करून नवीन ७/१२ देण्यात आलेला आहे. सदरची जमीन हि या वनविभागास पर्यायी वनीकरणासाठी मा. जिल्हाधिकारी, नांदेड यांचेकडून वनेत्तर जमीन हंस्तातरीत करण्यात आलेली आहे. त्यानूसार सदर क्षेत्राचे भारतीय वन अधिनियम १९२७ चे कलम ४ अंतर्गत चा प्रस्ताव सादर करणेकामीचे काम प्रगतीपथावर आहे. |

**( केशव वाबळे )**
**उपवनसंरक्षक**
**नांदेड वनविभाग, नांदेड**

Scanned with CamScanner